ePaper
मयत शिक्षकांना निवडणुकीची ड्युटी, प्रशासनाच्या गोंधळावर संघटना संतापली

| वर्ष - 9 | अंक -130 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™



## आतील पानांत

- संघातील पंतचे स्थान धोक्यात?
- क्रिकेटच्या भवितव्याबाबत चिंता
- नववर्ष सोहळ्यात ड्रोन हल्ला
- एका हिंदू व्यक्तीला जाळण्याच्या प्रयत्न

www.mahaenews.com | शनिवार, दि. 3 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### मुंबई महानगर पालिका निवडणूक | मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं मोठं विधान

# मुंबईचा महापौर हिंदू-मराठीच होणार!

## महायुतीकडून महापालिका निवडणुकीसाठी ‘मराठी आणि हिंदुत्व’ अजेंड्याचा इशारा




| मुंबई |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, या निवडणुकीत कोणता मुद्दा केंद्रस्थानी राहणार, याची स्पष्ट झलक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यातून पाहायला मिळाली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान बोलताना फडणवीस यांनी अत्यंत ठाम आणि रोखठोक शब्दांत जाहीर केलं की, “मुंबईचा आगामी महापौर हा हिंदूच असेल आणि मराठीच असेल.”**

मुख्यमंत्र्यांच्या या विधानामुळे मुंबईच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, महायुतीने (भाजप, शिवसेना–शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस–अजित पवार गट) महापालिका निवडणूक थेट ‘मराठी अस्मिता आणि हिंदुत्व’ या मुद्द्यांवर लढवण्याचा स्पष्ट संकेत दिला आहे.

**नेमकं काय म्हणाले मुख्यमंत्री?**

मुंबईच्या महापौरपदाबाबत भाजप नेते कृपाशंकर सिंह यांच्या वक्तव्याचा आधार घेत प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त आणि उपरोधिक शैलीत उत्तर दिलं. फडणवीस म्हणाले,

“एक तर कृपाशंकर सिंह कुठे म्हणाले? ते मीरा-भाईंदरमध्ये बोलले, मुंबईत नाही. आणि दुसरं म्हणजे, कृपाशंकर सिंह आमचे अधिकृत प्रवक्ते आहेत का? आता विरोधकांकडे कोणीही काहीही बोलतं आणि तुम्ही ते उचलून मुंबईत दाखवता. तुम्ही फार हुशार लोक आहात!” यानंतर फडणवीस यांनी आपली भूमिका अधिक स्पष्ट करत ठामपणे घोषणा केली. “मी या पक्षाचा नेता म्हणून अधिकृतपणे सांगतो—मुंबईचा महापौर महायुतीचा होईल, मुंबईचा महापौर हिंदू होईल आणि मुंबईचा महापौर मराठी होईल.” या विधानानंतर महापौरपदाबाबत भाजप आणि महायुतीची भूमिका पूर्णपणे स्पष्ट झाली असून, कोणतीही संदिग्धता आता उरलेली नाही.

### मुंबईच्या मतदारावर ठरणार मुंबईच्या सत्तेचे भवितव्य...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘मुंबईचा महापौर हिंदू-मराठीच होणार’ या विधानाने मुंबई महानगरपालिका निवडणूक केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक न राहता, राजकीय अस्मितेची लढाई बनली आहे. आता प्रश्न एकच आहे, मुंबईचा मतदार कोणाच्या भूमिकेला कौल देतो? याच उत्तरावर मुंबईच्या सत्तेचा भवितव्य ठरणार आहे.

**महायुतीचा स्पष्ट राजकीय अजेंडा**

मुंबई महानगरपालिकेवर गेल्या जवळपास २५ वर्षांपासून शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांची सत्ता आहे. ही सत्ता काबीज करण्यासाठी महायुतीने यावेळी अभूतपूर्व तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे हे विधान म्हणजे निवडणुकीतील रणनीतीचा जाहीरनामा असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

मराठी माणसाचा हक्क, मुंबईवरील मालकी, आणि हिंदुत्वाची ओळख—हे मुद्दे एकत्र गुंफत महायुती मुंबईतील मराठी मतदार, मध्यमवर्गीय नागरिक, तसेच हिंदुत्ववादी मतदारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे.

**रोधकांची कोंडी वाढली**

फडणवीस यांच्या या घोषणेमुळे विरोधकांची, विशेषतः ठाकरे बंधूंची कोंडी झाल्याचे चित्र आहे. एकीकडे उद्धव ठाकरे ‘मराठी अस्मिता’ जपण्याचा दावा करत असताना, दुसरीकडे महायुती थेट ‘हिंदू-मराठी महापौर’ अशी घोषणा करत मैदानात उतरली आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यासाठीही हे आव्हान अधिक तीव्र ठरणार आहे. कारण मुंबईतील मतदारसंघांमध्ये ध्रुवीकरण होण्याची शक्यता आता अधिक वाढली आहे.

**कृपाशंकर सिंह प्रकरणावर पडदा**

कृपाशंकर सिंह यांच्या विधानावरून निर्माण झालेला वाद फडणवीसांनी एका वाक्यात मिटवला असला, तरी त्यामागे असलेली राजकीय वेळ साधण्याची खेळी स्पष्टपणे दिसून येते. मुंबई आणि मीरा-भाईंदरमधील वक्तव्यांचा संदर्भ बदलून दाखवल्याचा आरोप करत फडणवीस यांनी माध्यमांनाही अप्रत्यक्ष टोला लगावला.

**पालिका निवडणूक : महत्त्व काय?**

मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात श्रीमंत महापालिका मानली जाते. सुमारे ₹50,000 कोटींपेक्षा अधिक बजेट, प्रचंड प्रशासनिक ताकद आणि राजकीय प्रभाव यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

15 जानेवारी रोजी मतदान होणार असल्याने येत्या काही दिवसांत प्रचाराचा जोर प्रचंड वाढणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार असून, फडणवीस यांचे विधान या लढतीला नवी धार देणारे ठरले आहे.

**‘हिंदू-मराठी’ मुद्दा किती रिणामकारक?**

राजकीय विश्लेषकांच्या मते, हा मुद्दा मुंबईतील मराठी बहुल भागांमध्ये महायुतीला मोठा फायदा करून देऊ शकतो. विशेषतः गिरगाव, दादर, परळ, घाटकोपर, मुलुंड, कांदिवली यांसारख्या भागांत या घोषणेचा प्रभाव दिसून येण्याची शक्यता आहे.

**अमोल बालवडकरांचा इशारा**

## अजित दादांवर यापुढे बोलाल तर

# मोहोळांची अजित पवारांवर टीका

## फेसबुक पोस्ट करुन साधला निशाणा

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिका निवडणुकीसाठी सर्व पक्षाकडून जोरदार प्रचार सुरु आहे. पुण्यातील राष्ट्रवादीच्या गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या उमेदवारांवरुन भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टिका केली. मोहोळांनी केलेल्या टीकेवर राष्ट्रवादीचे नेते अमोल बालवडकर यांनी प्रतिक्रीया दिली आहे. अजित पवारांवर यापुढे बोलल्यास जसाच तसे उत्तर देण्यात येईल, असा इशाराही अमोल बालवडकर यांनी दिला आहे.**





पुणे गुन्हेगारी मुक्त करण्याचा दावा करणाऱ्या अजित पवारांनी “पालकमंत्री एकीकडे पुणे गुन्हेगारी मुक्त झालं पाहिजे असं म्हणतात आणि दुसरीकडे शहराच्या पुर्वेपासुन पश्चिमेपर्यंत त्यांचे उमेदवार पाहिले तर ते कोणत्या तत्वात बसत” असं मुरलीधर मोहोळ म्हणाले होते. मोहोळ यांच्या या टीकेला भाजपमधून अजित पवारांच्या पक्षात प्रवेश केलेल्या अमोल बालवडकारांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत उत्तर दिलं आहे.गुन्हेगारांना विदेशात पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या गुन्हेगारांचा “आका” बाजूला घेऊन बसणाऱ्या व केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावर निवडून आलेल्या सुसंस्कृत पुणे शहराच्या खासदारांनी आमचे नेते अजित दादा पवार यांना राजकारण शिकवू नये. तुमच्या “काठावर” निवडून येण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाही वाटा आहे हे विसरू नका, असं अमोल बालवडकर यांनी केलेल्या फेसबुक पोस्टमधे म्हटलं आहे. “गरज सरो वैद्य मरो” अशी तुमची नेहमीची भूमिका योग्य नाही. माझे नेते अजित दादांवर यापुढे बोलल्यास जसाच तसे उत्तर देण्यात येईल. जय जिनेंद्र !पुणे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक पक्षप्रवेश झाले, अनेकांना तिकीट नाकारले गेले. त्यापैकीच एक असलेले अमोल बालवडकर यांना पुण्यातील सुस – पाषाण – बाणेर प्रभाग क्रमांक 9 मधून भाजपने उमेदवारी नाकारली. तिकीट नाकारल्यानंतर अमोल बालवडकर यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. भाजपच्या स्थानिक नेत्यांनी माझी गेम केली. पण त्यांना दाखवून देणार की कार्यकर्ता काय असतो. असा इशारा अमोल बालवडकर यांनी दिला आहे. तसेच चंद्रकांत पाटील बाहेरून आले, त्यांच्यामुळे पुणेकरांना त्रास झाला. मेधाताई रडल्या पण मी लढणार.. पुणे महापालिकेवर आता घडीचा झेंडा दिसेल. अजित पवारांनी माझ्यावर विश्वास ठेवला. हा माझा पुनर्जन्म झाला आहे, कारण भाजपच्याच काही नेत्यांनी माझा राजकीय घातपात केला. असा आरोपही त्यांनी केला. पुणे महापालिका निवडणुकीसाठी सर्व पक्षाकडून जोरदार प्रचार सुरु आहे. पुण्यातील राष्ट्रवादीच्या गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या उमेदवारांवरुन भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टिका केली. मोहोळांनी केलेल्या टीकेवर राष्ट्रवादीचे नेते अमोल बालवडकर यांनी प्रतिक्रीया दिली आहे. अजित पवारांवर यापुढे बोलल्यास जसाच तसे उत्तर देण्यात येईल, असा इशाराही अमोल बालवडकर यांनी दिला आहे शहराच्या पुर्वेपासुन पश्चिमेपर्यंत त्यांचे उमेदवार पाहिले तर ते कोणत्या तत्वात बसत” असं मुरलीधर मोहोळ म्हणाले होते. मोहोळ यांच्या या टीकेला भाजपमधून अजित पवारांच्या पक्षात प्रवेश केलेल्या अमोल बालवडकारांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत उत्तर दिलं आहे.गुन्हेगारांना विदेशात पळून जाण्यासाठी मदत करणाऱ्या गुन्हेगारांचा “आका” बाजूला घेऊन बसणाऱ्या व केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावर निवडून आलेल्या सुसंस्कृत पुणे शहराच्या खासदारांनी आमचे नेते अजित दादा पवार यांना राजकारण शिकवू नये.

### भाजपवर बालवडकरांचा आरोप

तुमच्या “काठावर” निवडून येण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाही वाटा आहे हे विसरू नका, असं अमोल बालवडकर यांनी केलेल्या फेसबुक पोस्टमधे म्हटलं आहे. “गरज सरो वैद्य मरो” अशी तुमची नेहमीची भूमिका योग्य नाही. माझे नेते अजित दादांवर यापुढे बोलल्यास जसाच तसे उत्तर देण्यात येईल. जय जिनेंद्र !पुणे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक पक्षप्रवेश झाले, अनेकांना तिकीट नाकारले गेले.

# उजनीच्या तीरावर चित्रबलाकांचा विणीचा उत्सव

## भादलवाडी तलावात शेकडो चित्रबलाकांची घरटी; निसर्गप्रेमी व पक्षिनिरीक्षकांची वाढती गर्दी

। इंदापूर ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील इंदापूर तालुक्यातील भादलवाडी येथील ऐतिहासिक ब्रिटिशकालीन तलाव सध्या निसर्गसौंदर्याने नटला असून, देशी-विदेशी पक्ष्यांच्या किलबिलाटाने परिसर गजबजून गेला आहे. विशेषतः देखण्या आणि आकर्षक चित्रबलाक पक्ष्यांनी येथे विणीच्या हंगामासाठी मोठी लगबग सुरू केली असून, तलावाच्या पाण्याने वेढलेल्या काटेरी बाभळीच्या झाडांवर त्यांनी सुरक्षित घरटी बांधण्यास सुरुवात केली आहे.**



दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात थंडीचा कडाका वाढू लागला की उजनी जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात चित्रबलाकांचे आगमन होते. सुरक्षित अधिवास आणि मुबलक अन्नसाठा यामुळे भादलवाडी तलाव हा त्यांच्या पसंतीचा ठिकाण ठरला आहे. तलावात पाण्यात उभ्या असलेल्या काटेरी बाभळीच्या झाडांमुळे भक्षकांपासून संरक्षण मिळते, त्यामुळे हे पक्षी येथे निर्धास्तपणे घरटी बांधतात. सध्या तलावात पुरेसा पाणीसाठा असल्याने शेकडो चित्रबलाकांनी घरटी उभारली असून, काही मादी पक्ष्यांनी अंडी घातल्याचेही निरीक्षणात आले आहे. चित्रबलाकांच्या विणीच्या हंगामात नर आणि मादी दोघेही समन्वयाने काम करताना दिसतात. घरटी बांधणे, अंड्यांची निगा राखणे आणि पुढे पिलांचे संगोपन करणे या सर्व जबाबदाऱ्या ते एकत्रितपणे पार पाडतात. पुढील काही महिने हे पक्षी याच परिसरात मुक्काम करून पिलांची काळजी घेतात. पिलांची पंखे बळकट झाल्यानंतर आणि उड्डाणासाठी ते सक्षम झाल्यावर हे पक्षी पुन्हा नव्या प्रवासाला निघतात.

उजनी जलाशयाप्रमाणेच भादलवाडीचा तलावही आता पक्षी पर्यटनासाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. या तलावात चित्रबलाकांसह राखी बगळे, पाणकावळे, करकोचे, शेकाट्या तसेच विविध जातींचे पानपक्षी पाहायला मिळतात. त्यामुळे पक्षिनिरीक्षक, छायाचित्रकार आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने येथे भेट देत आहेत.

### भादलवाडी तलाव हे पक्षीप्रेमींसाठी एक आदर्श पर्यटनस्थळ ठरेल,

भादलवाडी तलाव हा चित्रबलाकांसाठी सुरक्षित आणि समृद्ध अधिवास मानला जातो. गेल्या काही वर्षांत येथे पक्ष्यांची संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. मात्र, या परिसराचे संवर्धन करणे तितकेच आवश्यक आहे. तलावातील काटेरी झाडांचे संरक्षण करणे, पाणीसाठा टिकवून ठेवणे आणि आवश्यकतेनुसार खडकवासला कालव्यातून पाणी सोडणे गरजेचे आहे. योग्य संवर्धन झाल्यास उजनी परिसरातील भादलवाडी तलाव हे पक्षीप्रेमींसाठी एक आदर्श पर्यटनस्थळ ठरेल, असा विश्वास पक्षिनिरीक्षक डॉ. अरविंद कुंभार यांनी व्यक्त केला आहे.

## मिशन–PCMC : पिंपळे सौदागरमध्ये भाजपाच्या

# इच्छुक उमेदवारांचा पक्षनिष्ठेचा आदर्श!

## उमेदवारी अर्ज मागे घेत अधिकृत उमेदवारांना भक्कम पाठिंबा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवडमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६ सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपळे सौदागर–रहाटणी परिसरात भारतीय जनता पार्टीच्या इच्छुक उमेदवारांनी दाखविलेली पक्षनिष्ठा आणि संघटनात्मक शिस्त लक्षवेधी ठरली आहे. "राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" या भूमिकेतून इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज माघारी घेत अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे.**



प्रभाग क्रमांक २८ मधून निर्मलाताई कुटे, जयनाथजी नारायण काटे, कैलासजी प्रधान कुंजीर, सुप्रियाताई राजेश पाटील आणि रिनाजी दिनेश काटे यांनी इच्छुक उमेदवार म्हणून अर्ज दाखल केले होते. मात्र, पक्षाचा अधिकृत निर्णय मान्य करत सर्वांनी अर्ज मागे घेतले असून, भाजपाच्या अधिकृत पॅनेलच्या प्रचारासाठी सक्रिय सहभाग घेण्याची भूमिका

### भाजपा उमेदवार तथा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पक्षनिष्ठ उमेदवारांचे मानले आभार

घेतली आहे. या निर्णयामुळे प्रभागात भाजपाचे मतविभाजन टळले असून, संघटनात्मक एकजूट अधिक बळकट झाली आहे. भाजपाचे अधिकृत उमेदवार तथा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पक्षनिष्ठ उमेदवारांचे मनापासून आभार मानत, या एकजुटीच्या बळावर प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा विश्वास व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक २८ मध्ये शत्रुघ्न काटे, अनिता काटे, कुंदा भिसे आणि संदेश काटे हे भाजपाचे अधिकृत उमेदवार असून, इच्छुक उमेदवारांच्या या पाठिंब्यामुळे निवडणूक रणधुमाळीत भाजपाची स्थिती अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे. पक्षशिस्त, संघटनात्मक ताकद आणि विकासाचा ठोस अजेंडा याच जोरावर मिशन PCMC यशस्वी करण्याचा निर्धार भाजपाने केला आहे.

> "प्रभाग क्रमांक २८ मधील नागरिकांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि पक्षाने दिलेली जबाबदारी ही केवळ सन्मानाची नाही, तर मोठी जबाबदारी आहे. सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन, कोणताही भेदभाव न करता प्रभागाचा सर्वांगीण विकास करणे, मूलभूत सुविधा अधिक सक्षम करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्याने न्याय देणे हाच माझा निर्धार आहे. भाजपाची विकासाभिमुख भूमिका आणि कार्यकर्त्यांची एकजूट याच्या बळावर शाश्वत विकासाचा संकल्प आहे.
> **–शत्रुघ्न काटे,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 28, रहाटणी- पिंपळे सौदागर.

# 'सत्ता द्या, सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी लावतो'; अजित पवार

## महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत भाजप विरोधात तोफ डागली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी : टेंडरमध्ये रिंग, प्रत्येक ठिकाणी दादागिरी, निविदांचा फुगवटा, टेंडरमध्ये खडाखोड जादा दराने प्रत्येक वेळी काम देणे, सल्लागारांची नियुक्ती ,महापालिकेच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये घातलेला गोंधळ या सर्वांची माझ्याकडे पुराव्यांशी माहिती आहे. आमच्या हातात सत्ता द्या या सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी लावतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार पिंपरी येथे म्हणाले.**



पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपवर तोफ डागली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष तथा माजी महापौर योगेश बहल, शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तुषार कामठे, माजी आमदार विलास लांडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आधी उपस्थित होते.

यावेळी अजित पवार म्हणाले पिंपरी चिंचवड मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे अनेक कामांमध्ये वारंवार दरवाढ देत भ्रष्टाचार करण्यात आला आहे. अजित पवार पुढे म्हणाले टेंडर मध्ये रिंग केली जाते दादागिरी करून कामे ठराविक व्यक्तींनाच दिली जातात निवेदन मध्ये प्रचंड फुगवता निर्माण करून टेंडर मध्ये खाडाखोड करून कामे बळकवली जातात.रस्त्यांच्या अलीकडे पलीकडे अशाप्रकारे कामांची वर्गवारी केली जाते आणि आपल्या जवळच्या लोकांना कामी दिली जातात काही लोकांच्या गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात प्रॉपर्टी कशा वाढल्या यांची कुठे इंडस्ट्री आहे असे देखील अजित पवार म्हणाले.

कोरोना काळातील कुत्र्यांच्या नसबंदीचा मुद्दा देखील अजित पवार यांनी उपस्थित केला. 7 हजार 145 कुत्र्यांची नसबंदी केली. यामध्ये 71 लाख रुपये अदा करण्यात आले आणि तरीदेखील गेल्या ऑक्टोबर महिन्यापर्यन्त 20 हजार जणांना कुत्रे चावले असल्याची पालिकेची आकडेवारी आहे, मग नसबंदी झालेले कुत्रे गेले कुठे असा सवाल देखील पवार यांनी उपस्थित केला.

### पिंपरी चिंचवडमध्ये खोदाई माफिया फोफावला

अजित पवार म्हणाले, अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली रस्त्यांची वाट लावण्यात आली आहे. अनेक रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून तिथे उघडपणे हफ्तेखोरी सुरू आहे. गेल्या नऊ वर्षांत भाजपच्या सत्ताकाळात असा विकास झाला आहे. टेंडरमध्ये रिंग करून दादागिरीने पैसे लाटले गेले. स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांच्या संपत्ती कशा वाढल्या, पैसा कुठून आला, याची चौकशी झालीच पाहिजे. महापालिकेवर टीका करताना त्यांनी सांगितले की, सत्तेची मस्ती, माज आणि नशा भाजपला आली आहे. कुत्र्यांच्या नसबंदीतही पैसे खाल्ले गेले. महापालिका अक्षरशः भ्रष्टाचाराने पोखरली गेली आणि कर्जबाजारी करण्यात आली. पिंपरी चिंचवडमध्ये खोदाई माफिया फोफावला असून जिओ, एअरटेल, व्होडाफोनसारख्या कंपन्या राजरोसपणे रस्ते खोदत आहेत. शहरात दिवसाढवळ्या लुटारूंची टोळी वावरत आहे, असा आरोपही अजित पवारांनी केला.



## भूमिका

**खेळ आणि खेळांतील सहभाग हे मानवी संस्कृतीचे आदिलक्षण; पण त्याला आधुनिक आयोजनाचे रूप देणाऱ्या अर्वाचीन ऑलिम्पिकच्या प्रवासात राजकारण, अर्थकारण, युद्धे, बहिष्कार, दहशतवाद आणि वातावरणीय बदलाचे आधुनिक धोके अशी अनेक वळणे, कंगोरे सापडतात. त्यांचा धांडोळा घेणारे हे नवे पाक्षिक सदर...**

# जावे (का बरे) ऑलिम्पिकच्या वाटेला...

जगात आजवर मोजक्याच देशांनी ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद भूषवले. ते भरवणे म्हणजे प्रतिष्ठेचे असते, देशाच्या आर्थिक आणि तंत्रज्ञानात्मक प्रगतीचे निदर्शक असते याची भारतीयांना जाणीव करून देण्याचे श्रेय मात्र विद्यामान केंद्र सरकारचे. नरेंद्र मोदी सरकारने ऑलिम्पिक आयोजनाची महत्त्वाकांक्षा गेली काही वर्षे बाळगली आणि त्या दिशेने तयारीही सुरू केली. पुढील ऑलिम्पिक सन २०२८ मध्ये अमेरिकेत लॉस एंजलिस येथे होत आहे. त्यापुढील म्हणजे २०३२ मधील ऑलिम्पिकचे यजमानपद ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन शहराला मिळाले आहे.भारताचा प्रयत्न २०३६ मधील यजमानपद मिळवण्याचा आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेकडून २०३६ ऑलिम्पिक यजमानपदाची अधिकृत घोषणा पुढील वर्षी किंवा २०२८ मध्ये होणे अपेक्षित आहे. दरम्यानच्या काळात भारतीय ऑलिम्पिक संघटना आणि केंद्र सरकार यांना




यजमानपद मिळवण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतील. ऑलिम्पिक स्पर्धा भरवणे खर्चीक असते, याविषयी जाणीव पहिल्या आधुनिक ऑलिम्पिकपासूनच सजग होती.अलीकडच्या काळात ती अधिक तीव्र झाली. किमान अर्थभान असलेल्यांनी या स्पर्धेच्या आयोजनाच्या फंदात पडू नये, असा सल्ला देणारे विचारलेख विशेषत: गेल्या तीसेक वर्षांमध्ये खोऱ्याने प्रसिद्ध झाले असतील. त्यांना गांभीर्याने घ्यायचे ठरवले, तर ही स्पर्धा भरवणे प्राप्त परिस्थितीत शुद्ध वेडेपणाचेच वाटू लागेल. पण अर्थतज्ज्ञ देशाचे कारभारी नसतात आणि ऑलिम्पिक स्पर्धा भरवण्यात आर्थिक शहाणपणापलीकडे इतर घटकच सक्रिय असतात. ही स्पर्धा भरवणे अत्यंत आव्हानात्मक असते, म्हणूनच तिचे यशस्वी आयोजन कौतुकास पात्र ठरते. किंबहुना, प्रतिमा संवर्धनाच्या चालू युगात ते आवश्यक ठरते. ऑलिम्पिक यजमानपद ही आजवर नेहमीच अतिप्रगत आणि प्रगत अर्थव्यवस्थांची मक्तेदारी राहिली. आगामी दोन स्पर्धा या लॉस एंजलिस (२०२८) आणि ब्रिस्बेन (२०३२) शहरांमध्ये होत आहेत. त्या जमेस धरल्यास, अमेरिकेच्या नावावर चार ऑलिम्पिक स्पर्धा दिसून येतात. यात आश्चर्य नाही. गतशतकातील सर्वांत शक्तिशाली, श्रीमंत आणि दोन्ही महायुद्धांची झळ कमीत कमी बसलेला मुख्य प्रवाहातील देश तो हाच. त्या खालोखाल फ्रान्स (३), ब्रिटन (३), ऑस्ट्रेलिया (३) अशी क्रमवारी लागते.फ्रान्स ही आधुनिक ऑलिम्पिक संकल्पनेची जन्मभूमी. कारण या संकल्पनेचे जनक पिअर द कुबर्ता इथलेच. ब्रिटन ही गतशतकातली प्रमुख वसाहतग्राही महासत्ता. दुसऱ्या महायुद्धापर्यंत ती जगातली बहुधा एकमेव महासत्ता होती. त्यामुळे या दोन मोठ्या युरोपीय देशांनी तीन-तीन ऑलिम्पिक स्पर्धा भरवल्या, यातही फार धक्कादायक असे काही नाही. ऑस्ट्रेलिया हा आधुनिक युद्धोत्तर काळातील नवप्रगत देश. भौगोलिक विलगीकरणामुळे आणि राजकीय अलिप्ततेमुळे संघर्षापासूनही दूर राहिला. लोकशाही व्यवस्था आणि संसाधन समृद्धी यांच्या जोरावर पश्चिम युरोप आणि अमेरिकेच्या तोडीची प्रगती या देशास साधली. त्यामुळे ऑलिम्पिक स्पर्धा परवडू शकल्या. नवीन सहस्राकात दोन स्पर्धांचे आयोजन (सिडनी २०००, ब्रिस्बेन २०३२) करणारा हा एकमेव देश. याशिवाय ग्रीस आणि जपानने दोन वेळा ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भूषवले. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि आता ऑस्ट्रेलिया व जपान हे अतिप्रगत देश म्हणवले जाऊ शकतात. त्यांच्या खालील स्तरावर ग्रीसचा समावेश होतो.मेक्सिको, दक्षिण कोरिया, ब्राझील, चीन यांचेही तेच. स्वीडन, बेल्जियम, नेदरलँड्स, इटली, फिनलंड, कॅनडा, जर्मनी, रशिया हेही प्रगत जगतातले देश. पण यापैकी कोणीही दुसऱ्यांदा ऑलिम्पिक भरवण्याची इच्छाशक्ती वा क्षमता दर्शवलेली नाही. भारत या सर्वांपेक्षा अनेक आर्थिक व सामाजिक निकषांवर मागास ठरवला गेलेला देश.इथे पैसा आणि महत्त्वाकांक्षेची नाही.

## प्रासंगिक »

# चतकोरावरच सुख?

***आपली अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर आली असतानाही भारत सरकारचे रोखे विकण्याकडे परदेशी गुंतवणूकदारांचा कल वाढणे हे गंभीरच...***

नव्या वर्षाची सुरुवात होत असताना भारताची अर्थव्यवस्था जपानला मागे टाकून जगातील चौथ्या क्रमांकावर गेल्याचे वृत्त २०२५ च्या अखेरच्या दिवशी येणे आणि आज एक जानेवारी २०२६ या नववर्षदिनी प्रसृत होणे ही अत्यानंदाची बाब. वर्षअखेरीस आपल्या अर्थव्यवस्थेने चार लाख १८ हजार कोटी डॉलर्सचा टप्पा गाठला. एकेकाळी आपल्यावर राज्य करणाऱ्या इंग्लंडला तर आपण कधीच मागे टाकले आहे. आज आपण जपानच्या पुढे गेलो. म्हणजे आता आपल्यापुढे फक्त तीन देश तेवढे राहिले. तिसऱ्या क्रमांकावरचा जर्मनी, दुसऱ्यावरून पहिल्यावर जाऊ पाहणारा चीन आणि कित्येक दशकांपासून पहिल्या क्रमांकावर प्रतिष्ठापित एकमेवाद्वितीय अमेरिका. या तीन देशांस एकदा का मागे सारले की झाले.आपण झालोच महासत्ता. वास्तविक यातील जर्मनी तर आपल्या महाराष्ट्राइतकाही नाही.

कार्य, कर्तृत्व, वैचारिक प्रगल्भता, सामाजिक पार्श्वभूमी, स्वीकृती, निष्ठा, ध्येय – उद्दिष्टं वगैरे अशा अनेक निकषांतून पाझरत येणाऱ्यांपैकी एका इच्छुकाला पक्षाकडून निवडणुकीत उमेदवारी दिली जायची. ही प्रक्रियाच मुळी लोकप्रतिनिधींसाठी सामाजिक व राजकीय वर्तवणुकीचा एक आदर्श निर्माण करायची.

# भिकार राजकारणाचा बेकार निकष...

अशातूनच या देशाला सुसंस्कारी, तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक लोकप्रतिनिधी लाभत आले होते. त्यामुळेच काही तुरळक अपवाद वगळता, साधुसंतांच्या या भारतभूमीतील जननायक हे संस्कारांच्या चौकटीत राहून जबाबदारीने वागत. परंतु स्वार्थांधपणाच्या विकृतीचे इथे संक्रमण झाले आणि सारेच बदलले, बदलत चालले आहे. नैतिकतेला प्राधान्य देणारी ती निवड प्रक्रिया आता दुर्मिळ नाही तर नामशेष झाली असल्याचे दिसते. त्याचेच परिणाम म्हणजे, 'आजचे राज्यकर्ते'.राजकारणात आजकाल उमेदवारी देताना एकच निकष बघितला जातो आणि तो म्हणजे 'जिंकून येण्याची क्षमता'. इच्छुक उमेदवार या एकाच निकषामध्ये जरी अव्वल असेल आणि बाकीच्या सर्व निकषांमध्ये तो नालायक असला तरी त्यालाच प्रथम पसंती असतो, ही आजची शोकांतिका राजकारणातील 'न्यू नॉर्मल' झाली आहे. आजचा राजकीय गलिच्छपणा, पक्षव्यभिचार, निर्लज्जपणा आणि त्यातून केवळ जिंकून येण्याचीच



क्षमता असलेले राजकारणी ही सारी याच निकषाची कटु फळे आहेत. आता निवडून येण्याची क्षमता म्हणजे नक्की काय ? या चिखलात बरेच काही सामावलेले असलं तरी, 'मनी पॉवर ॲण्ड मसल पॉवर' या दोन गोष्टी सर्वाधिक प्रभावी. या श्रेणीत येणाऱ्यांमध्ये 'मसल पॉवरद्वारे मनी पॉवर' उभी करणाऱ्यांना अधिक पसंत केले जाते. दहशत हे यांचे सर्वात प्रभावी अस्त्र होय आणि याच्याच सहाय्याने त्यांचे हात मतदारसंघात सर्वत्र पोहोचलेले व सगळ्यात रुतलेले असतात. या दृष्टिकोनातून सगळ्यांना त्यांचा परिचय असणे स्वाभाविकच नव्हे तर अपरिहार्य होते. यालाच काहीजण 'अफाट जनसंपर्क' समजतात. त्यातून लाभलेल्या सुप्रसिद्धी वा कुप्रसिद्धीमुळे त्यातील बरेच निवडूनदेखील येतात वा येऊ शकतात. एखाद्या मतदारसंघात जेव्हा अशा प्रकारचे व्यक्तिमत्व राज्य करते तेव्हा त्या मतदारसंघाची याच्या विळख्यातून सहजासहजी लवकर सुटका होणे मुश्किल होऊन बसते. राजकीय पक्षांना हे माहीत असल्याकारणाने ते आपल्या पक्षाला बहुमत मिळावे यासाठी असल्यांना आपलेसे करतात.अगोदर राज्यात एक कोणीतरी असा बाहुबली हेरला जायचा. पुढे प्रत्येक विभागाचा, जिल्ह्याचा, तालुक्याचा, गावाचा, मतदारसंघाचा आणि आज तर प्रत्येक गल्लीत आपला असा एखादा हस्तक असलाच पाहिजे अशा मनस्थितीत आजचे राजकीय पक्ष पोहोचले आहेत. गुन्हेगारांना अन्यायकारक. निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवार जर करोडो रुपये खर्च करत असेल तर निवडून आल्यावर या खर्चाच्या कमीतकमी पन्नास पट वसूल करण्याची त्याची नियोजित महत्त्वाकांक्षा त्याला सारे गैर मार्ग पत्करायला प्रोत्साहित करते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## काँग्रेसची आयुक्तांकडे मागणी
## कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

# नार्वेकरांविरोधात गुन्हा दाखल करा!

## निवडणूक प्रक्रियेत अडथळा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना अर्ज दाखल करताना धमकावल्याचा प्रकार अत्यंत गंभीर आहे. नार्वेकर यांचे वर्तन आक्षेपार्ह व आदर्श आचारसंहितेचा भंग करणारे असल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत तसेच त्यांच्या कार्यालयातील तब्बल ७० अधिकारी व कर्मचारी नार्वेकर यांचे नातेवाईक असलेल्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारात सक्रीय भाग घेत आहेत, या सर्वांवरही आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



२२५, २२६ व २२७ मधून राहुल नार्वेकर यांचे भाऊ मकरंद नार्वेकर, बहिण गौरवी शिवलकर व वहिनी हर्षदा नार्वेकर या तिघांनी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत, अर्ज दाखल करताना राहुल नार्वेकर हे स्वतः उपस्थित होते. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असताना राहुल नार्वेकर यांनी पोलिसांच्या माध्यमातून भाजपा उमेदवारांच्या विरोधात अर्ज दाखल करणाऱ्या विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले तसेच अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले, अशा प्रकारे एका महत्वाच्या व संविधानिक पदावरील व्यक्तीने लोकशाहीचे धिंडवडे काढून निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणला आहे. याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी या पत्राद्वारे निवडणूक आयोगाला करण्यात आली. राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर आहेत, त्यांच्याकडून अशापद्धतीने कायदा धाब्यावर बसून दडपशाहीचा मार्ग अवलंबणे लोकशाहीचा खून करण्यासारखे कृत्य आहे. महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे, आणि निवडणूक आयोगाच्या पाठीचा कणा मजबूत आहे हे आपण दाखवून द्यावे असेही सपकाळ यांनी या पत्रात नमूद केले.मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांना धमकावून अर्ज भरू न दिल्याचा आरोप माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी राहुल नार्वेकर यांनी केला. हे अर्ज दाखल करून घेण्याची मागणी करणाऱ्या हरिभाऊ राठोड यांची सुरक्षा काढून घ्या असे आदेशच फोनद्वारे सहपोलीस आयुक्तांना देताना नार्वेकर यांनी दिल्याची चित्रफीच समाज माध्यमांमध्ये समोर आली आहे. ही चित्रफीत शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी ट्विट केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे थेट माजी खासदार हरिभाऊ राठोड यांची तातडीने सुरक्षा काढून घेण्यास मुंबई पोलिसांना सांगताना दिसून आले आहेत. त्यांनी सहपोलीस आयुक्तांना फोन लावून थेट सुरक्षा आताच्या आता सुरक्षा काढा, हा विधानसभा अध्यक्षांचा आदेश आहे, असे त्यांनी यात म्हटले आहे. जर तुम्हाला सहकार्य करायचे नसेल, तर सुरक्षा मिळणार नाही. यावर उपस्थित कार्यकर्त्यांनी आम्ही आंदोलनकर्ते असल्याचे सांगितले.तसेच हरिभाऊ राठोड यांनी देखील आक्रमक पवित्रा घेत राहुल नार्वेकरांना उद्देशून म्हटले की तुम्ही मला फासावर पण चढवू शकता. यावर राहुल नार्वेकर म्हणतात, हे तुम्हाला माहिती असून सुद्धा असे का वागता? हरिभाऊ राठोड आता तुम्ही निवृत्त व्हा आणि आराम करा, असेही नार्वेकर म्हणाले आहेत. पाहिजे अशी मागणी संजय राऊत यांनी केली. यावेळचे निवडणूक आयोगाजवळचे फुटेज गायब झाल्याची माहिती असून संशय अधिक बळावत असल्याचे राऊत म्हणाले.

## आचारसंहिता भंगाचे गुन्हे

आपली सुरक्षा ही आपल्याला आलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर देण्यात आलेली आहे. ती काढण्याचा अधिकार नार्वेकर यांना कोणी दिला असा सवाल केला. यासंदर्भात निवडणूक आयोग तसेच महापालिका आयुक्तांकडे दाद मागत असल्याचे राठोड म्हणाले.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना अर्ज दाखल करताना धमकावल्याचा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

# बॅनरवर शरद पवारांचा फोटो कायम राहणार

## अजित पवारांच्या विधानामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीसाठी अर्ज माघारीची अंतिम मुदत अखेर संपली आहे. त्यामुळे युती-आघाडीचं चित्रही स्पष्ट झालं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादी म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एकत्र आले आहेत.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हे दोन्ही गट एकत्र आल्याने हे दोन्ही पक्ष पुन्हा कायमचे एकत्र येतील का असा प्रश्न सातत्याने विचारला जात आहे. त्यातच, याबाबत अजित पवारांनी दिलेल्या उत्तरामुळे सकारात्मकता निर्माण झाली आहे.महापालिका निवडणुकीसाठी अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर अजित पवार यांनी शुक्रवारी सायंकाळी पिंपरीत पत्रकार परिषद घेतली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, प्रचारप्रमुख नाना काटे, अजित गव्हाणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यावेळी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादीच्या बॅनरवर शरद पवारांचाही फोटो होता. या फोटोवरून पत्रकारांनी अजित पवारांना प्रश्न विचारला."तुमच्या बॅनरवर पवारसाहेबंचा फोटो दिसला. तो फोटो कायमस्वरुपी दिसणार का?", असा प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला. त्यावर अजित पवारांनी अत्यंत मोजकंच पण सुचक वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, "तुझ्या तोंडात साखर पडो." त्यांच्या या विधानामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे संकेत असल्याचं म्हटलं जातंय. त्यामुळे महापालिका निवडणुकांनंतर महाराष्ट्रात पुन्हा राजकीय समिकरणं बदलतात का हे पाहावं लागेल.उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले, "केंद्रात, राज्यात महायुती सरकारसोबत आहे. पण, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक स्वबळावर लढली जात आहे. पिंपरी-चिंचवड शहर बदलत गेले. १९९१ ला मला शहराने खासदार केले. तेव्हापासून शहराशी माझे नाते आहे. शहरातील विकास कामांना सुरुवात केली. तेव्हापासून २०१७ पर्यंत महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. २०१७ मध्ये अनेकांना पदे दिली, तरी ते सोडून गेले. आता त्या माजी महापौर भाजपच्या उमेदवार आहेत."स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हे दोन्ही गट एकत्र आल्याने हे दोन्ही पक्ष पुन्हा कायमचे एकत्र येतील का असा प्रश्न सातत्याने विचारला जात आहे.



## तुझ्या तोंडात साखर पडो

अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर अजित पवार यांनी शुक्रवारी सायंकाळी पिंपरीत पत्रकार परिषद घेतली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, प्रचारप्रमुख नाना काटे, अजित गव्हाणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यावेळी उपस्थित होते.

## २४ जणांचा मृत्यू

## कर्नाटक सरकारच्या सर्वेक्षणामुळे काँग्रेसवर नामुष्की

# 84 टक्के मतदारांचा यंत्रांवर विश्वास!

## काँग्रेस पक्ष अडचणीत सापडला

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मतदानयंत्रे व मतचोरीसंदर्भात कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या एका विभागाने प्रसिद्ध केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालामुळे पक्षाचे नेतृत्व अडचणीत आले. या 'आ बैल मुझे मार' प्रकारामुळे कर्नाटक सरकारला हा अहवाल संकेतस्थळावरून शुक्रवारी काढून टाकण्याची नामुष्की सहन करावी लागली.**



२०२४ च्या लोकसभा निवडणुकीशी संबंधित हे सर्वेक्षण असून त्यामध्ये सहभागी झालेल्या सुमारे ८४ टक्के लोकांनी मतदानयंत्रांवर विश्वास दाखवला आहे तर, ८४.५५ टक्के लोकांनी निवडणुका मुक्त व निष्पक्ष होत असल्याचे मत व्यक्त केले आहे. या गोंधळावर दिल्लीतील पक्षाच्या नेत्यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. मात्र कर्नाटकातील काँग्रेसचे नेते व मंत्री यांनी या सर्वेक्षणामागे केंद्रीय निवडणूक आयोगाचा संबंध असल्याचा दावा केला आहे. मतदानयंत्रे व निवडणुकांच्या निष्पक्षतेवर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वारंवार शंका घेतली आहे. असे असताना या सर्वेक्षणात राहुल गांधींच्या मताच्या अगदी उलट निरीक्षणांची नोंद केली आहे. त्यामुळे काँग्रेस अडचणीत सापडला असल्याचे चित्र शुक्रवारी निर्माण झाले. ऑगस्ट २०२५ मध्ये तयार केलेला हा अहवाल काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आला होता. मात्र, आता तो 'कर्नाटक मॉनिटरिंग अँड इव्हॅल्युएशन ऑथॉरिटी' (केएमईए) या राज्य सरकारच्या नियोजन, कार्यक्रम निरीक्षण व सांख्यिकी विभागाच्या संकेतस्थळावरून हटविण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी दुपारी कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी व्ही. अंबुकुमार यांच्या कार्यालयाने हा अहवाल प्रसारमाध्यमांना उपलब्ध करून दिला.या सर्वेक्षणात कर्नाटकातील ३४ जिल्ह्यांतील १०२ विधानसभा मतदारसंघांमधील ५ हजार १०० नागरिकांचा समावेश होता. बंगळुरू, बेळगावी, कलबुर्गी आणि म्हैसूर या चार विभागांत हे सर्वेक्षण झाले होते. म्हैसूरमधील स्वयंसेवी संस्था 'ग्रासरूट्स रिसर्च अँण्ड अॅडव्होकेसी मूव्हमेंट' यांनी 'केएमईए' विभागाअंतर्गत हे सर्वेक्षण केले होते व त्याची लिंक राज्य निवडणूक आयोगाशीही जोडली होती.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बी. के. हरिप्रसाद यांनी या सर्वेक्षणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. पंतप्रधान कार्यालयात काम केलेल्या व्यक्तीने स्थापन केलेल्या स्वयंसेवी संस्थेकडून हे सर्वेक्षण केले गेल्याचा दावा हरिप्रसाद यांनी केला. पंचायत राज मंत्री प्रियंक खर्गे यांनी, हे सर्वेक्षण सांख्यिकीदृष्ट्या कमकुवत असून त्यातून ठोस निष्कर्ष काढता येत नाही, असे मत व्यक्त केले.दरम्यान, या सर्वेक्षणाचा आधार घेत भाजपने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर हल्लाबोल केला. मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्न उपस्थित करणाऱ्या राहुल गांधींच्या दाव्याला हे सर्वेक्षण चपराक देणारे आहे. लोकांचा मतदानयंत्रे व निवडणूक प्रक्रिया, लोकशाहीवर विश्वास आहे, अशी कर्नाटक विधानसभेतील विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी काँग्रेसवर टीका केली. मतदानयंत्रे व मतचोरीसंदर्भात कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या एका विभागाने प्रसिद्ध केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालामुळे पक्षाचे नेतृत्व अडचणीत आले. या 'आ बैल मुझे मार' प्रकारामुळे कर्नाटक सरकारला हा अहवाल संकेतस्थळावरून शुक्रवारी काढून टाकण्याची नामुष्की सहन करावी लागली. निवडणुकीशी संबंधित हे सर्वेक्षण असून त्यामध्ये सहभागी झालेल्या सुमारे ८४ टक्के लोकांनी मतदानयंत्रांवर विश्वास दाखवला आहे तर, ८४.५५ टक्के लोकांनी निवडणुका मुक्त व निष्पक्ष होत असल्याचे मत व्यक्त केले आहे. या गोंधळावर दिल्लीतील पक्षाच्या नेत्यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. मात्र कर्नाटकातील काँग्रेसचे नेते व मंत्री यांनी या सर्वेक्षणामागे केंद्रीय निवडणूक आयोगाचा संबंध असल्याचा दावा केला आहे.

### भाजपची राहुल गांधींवर टीका

मतदानयंत्रे व निवडणुकांच्या निष्पक्षतेवर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वारंवार शंका घेतली आहे. असे असताना या सर्वेक्षणात राहुल गांधींच्या मताच्या अगदी उलट निरीक्षणांची नोंद केली आहे. त्यामुळे काँग्रेस अडचणीत सापडला असल्याचे चित्र शुक्रवारी निर्माण झाले.ऑगस्ट २०२५ मध्ये तयार केलेला हा अहवाल काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आला होता.

# पतीचे आर्थिक वर्चस्व हे क्रौर्य नव्हे!

## वैवाहिक मतभेदांवर सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विदुष्ट आलेल्या वैवाहिक संबंधांमध्ये पती आर्थिकदृष्ट्या वरचढ असेल तर ते क्रौर्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच दिलेल्या एका निकालात स्पष्टपणे नमूद केले. "न्यायालयीन खटले हा वैयक्तिक हिशोब चुकते करण्याचा आणि सूड उगवण्याचा मार्ग असू शकत नाही," असे न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळताना याचिकाकर्त्या महिलेला सुनावले.**

तेलंगणमधील महिलेने तिचा विभक्त पती आणि त्याच्या नातेवाईकांविरुद्ध क्रौर्य आणि हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप करत एफआयआर दाखल केला होता. तो रद्द करावा अशी मागणी करणारा अर्ज तिच्या पतीने तेलंगण उच्च न्यायालयात दाखल केला होता. तो उच्च न्यायालयाने २७ एप्रिल २०२३ रोजी फेटाळला. त्याविरोधात पतीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी निकाल दिला आणि पत्नीने दाखल केलेला एफआयआर रद्द करण्यासह तेलंगण उच्च न्यायालयाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. तक्रारदार महिलेने आरोप



केल्याप्रमाणे, कोणतेही मानसिक किंवा शारीरिक नुकसान झाल्याचे दिसत नसताना पतीच्या आर्थिक वर्चस्वाला क्रौर्य म्हणता येणार नाही, असे न्या. नागरत्ना म्हणाल्या. पती-पत्नीदरम्यान खर्चावरून वाद होणे हा वैवाहिक जीवनाचा दैनंदिन भाग आहे, अशा कृत्यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ अंतर्गत (विवाहित महिलेला पती किंवा त्याच्या नातेवाईकांनी क्रूरतेने वागवणे) क्रौर्याची कृती समजता येणार नाही, असे न्यायालयाने आपल्या १९ डिसेंबरच्या आदेशात नमूद केले. न्यायालयांनी अशा तक्रारी हाताळताना अतिशय काळजीपूर्वक आणि खबरदारीने काम करायला हवे. तसेच वैवाहिक खटले हाताळताना व्यावहारिक वास्तव विचारात घ्यायला हवे. अशा बाबतीत आरोपींची अधिक खबरदारी आणि सावधगिरीने छाननी करणे आवश्यक असते, जेणेकरून अन्याय होणार नाही आणि कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर केला जाणार नाही.विदुष्ट आलेल्या वैवाहिक संबंधांमध्ये पती आर्थिकदृष्ट्या वरचढ असेल तर ते क्रौर्य नाहीन्यायालयाने अलीकडेचनिकालात स्पष्टपणे नमूद केले."न्यायालयीन खटले हा वैयक्तिक हिशोब चुकते करण्याचा आणि सूड उगवण्याचा मार्ग असू शकत नाही.

### याचिकाकर्त्या महिलेला सुनावले

न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळताना याचिकाकर्त्या महिलेला सुनावले.तेलंगणमधील महिलेने तिचा विभक्त पती आणि त्याच्या नातेवाईकांविरुद्ध क्रौर्य आणि हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप करत एफआयआर दाखल केला होता. तो रद्द करावा अशी मागणी करणारा अर्ज तिच्या पतीने तेलंगण उच्च न्यायालयात दाखल केला होता.

# सिंधू वर्मा यांचा 25 वर्षांचा संसार मोडला

मल्याळम अभिनेते मनू वर्मा व त्यांची पत्नी सिंधू वर्मा यांचा २५ वर्षांचा संसार मोडला आहे. मनू वर्मा व सिंधू वर्मा घटस्फोट घेणार आहेत. दोघेही दोन वर्षांपासून वेगळे राहत आहेत, अशी माहिती मनू वर्मा यांनी स्वतःच दिली आहे. घटस्फोट सध्या न्यायालयात विचाराधीन आहे. अद्याप कायदेशीररित्या घटस्फोट झालेला नाही, असंही मनू वर्मा यांनी नमूद केलं. मनू वर्मा हे ज्येष्ठ दिवंगत अभिनेते जगन्नाथ वर्मा यांचे पुत्र आणि प्रसिद्ध जाहिरात निर्माते प्रकाश वर्मा यांचे चुलत भाऊ आहेत.मी आणि माझी पत्नी वेगळे राहत आहोत. मात्र, आमचा अजून कायदेशीर घटस्फोट झालेला नाही. आम्ही पुन्हा एकत्र येण्याची शक्यता खूपच कमी आहे. आम्ही प्रेमात पडलो आणि त्यानंतर एकत्र आयुष्य जगू लागलो, असं म्हणण्याला आता काहीच अर्थ उरलेला नाही. कारण आमच्यापेक्षा जास्त एकमेकांवर प्रेम असणारी आणि एकत्र राहिलेली अनेक जोडपी विभक्त झाली आहेत. खरं तर किमान दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत आम्ही प्रेमात होतो आणि एकत्र होतो. पण नात्यात दुरावा यायला जास्त वेळ लागत नाही," असं मनू वर्मा यांनी 'मूव्ही वर्ल्ड मीडिया'शी बोलताना सांगितलं.मनू वर्मा पुढे म्हणाले, "जेव्हा नात्यात एकमेकांशी जुळवून घेणं शक्य नसतं, तेव्हा वेगळं होणंच चांगलं. उगाच एकत्र राहून संघर्ष करायची गरज नाही. एकत्र राहिल्याने अडचणी आणखी वाढल्या तर? तसं का करायचं? त्यापेक्षा वेगळं व्हायचं. परदेशात असंच असतं. तिथे वेगळे झाल्यानंतरही लोक मैत्री टिकवून ठेवतात. आपल्याकडे तसं झालं तर चांगलं.

# स्टार प्रवाहच्या 'या' मालिकांचा TRP घसरला

२०२५ च्या अखेरच्या आठवड्यात टीआरपीमध्ये कोणी बाजी मारली? कोणत्या मालिकांना प्रेक्षकांनी पसंती दिली याची आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. BARC इंडियाने २१ डिसेंबर ते २७ डिसेंबर या आठवड्याचा टीआरपी नुकताच जाहीर केला आहे. नेहमीप्रमाणे सायली-अर्जुनच्या 'ठरलं तर मग' मालिकेने या यादीत पहिलं स्थान मिळवलं आहे. गेली तीन वर्षे ही मालिका टीआरपीच्या शर्यतीत सातत्याने अव्वल स्थानी आहे. 'ठरलं तर मग' मालिकेपाठोपाठ दुसऱ्या स्थानावर आहे अर्णव-ईश्वरीची 'तू ही रे माझा मितवा' ही मालिका. प्राइम स्लॉट मिळाल्यापासून ही मालिका टीआरपीच्या शर्यतीत कायम दुसऱ्या स्थानी असते. यानंतर तिसरं स्थान 'कमळी'ने मिळवलं आहे. 'कमळी' या आठवड्यात स्लॉट लीडर सुद्धा ठरली आहे. याशिवाय 'कमळी'ने 'झी मराठी'वर सर्वाधिक टीआरपी मिळवला आहे. काव्या-पार्थ आणि जीवा-नंदिनीच्या 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत सध्या 'मिशन लग्नासाठी काहीपण' हा ट्रॅक सुरू आहे. या मालिकेला प्रेक्षकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळताना दिसतोय. 'कमळी', 'लग्नानंतर होईलच प्रेम' आणि 'घरोघरी मातीच्या चुली' या तिन्ही मालिकांना २१ ते २७ डिसेंबर दरम्यान ४.२ TVR मिळाला आहे. शिवानी सोनारची 'तारिणी' मालिका सलग दुसऱ्या आठवड्यात ९:३० वाजता स्लॉट लीडर ठरली आहे. यामुळे केदार-तारिणीचं 'मिशन गृहप्रवेश' यशस्वी होत पाहायला मिळत आहे. यानंतर ३.८ रेटिंगसह 'लक्ष्मी निवास' मालिका सहाव्या स्थानी आहे.

# सोनाली 51 वर्षीही दिसते खूपच सुंदर

अभिनेत्री सोनाली बेंद्रे ५१ वर्षांची झाली आहे. पन्नाशीतही तरुण अभिनेत्रींना लाजवेल, असं सोनालीचं सौंदर्य आहे. सोनालीला २०१८ मध्ये चौथ्या टप्प्याचा कर्करोग झाला होता. तिने कर्करोगावर न्यूयॉर्कमध्ये उपचार घेतले. २०२१ मध्ये ती पूर्णपणे बरी झाली आणि तेव्हापासून ती या आजाराबद्दल जागरूकता पसरवत आहे. कर्करोगावर मात केल्यावर सोनाली बेंद्रे महिलांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचा सल्ला देते. २०२५ च्या सुरुवातीला फराह खानशी बोलताना सोनाली बेंद्रेने एका महत्त्वाच्या सवयीबद्दल सांगितलं होतं. फराह खान व तिच्या घरी स्वयंपाक बनवणारा दिलीप हे दोघेही बहल कुटुंबाच्या घरी गेले होते. व्हिडीओत सोनाली आणि तिच्या सासूबाई मधू रमेश बहल यांनी एकत्र जेवण बनवलं होतं.सोनाली आणि तिच्या सासूने गंमतीत तक्रार केली होती की फराह त्यांच्या घरी फार येत नाही. त्यावर फराहने म्हटलं की संध्याकाळी आठ वाजल्यानंतर ती प्रवास करणं टाळते. फराह खान जेवणाची वेळ काटेकोरपणे पाळते, त्यामुळे ती रात्री बाहेर जात नाही."मला फार उशीरा जेवायला आवडत नाही... मी संध्याकाळी ६:३० किंवा ७ वाजेपर्यंत जेवण करते. आणि मग जेव्हा इतर लोक जेवत असतात, तेव्हा मला त्यांच्याबरोबर बसावं लागतं. ही गोष्ट मला खूप थकवणारी वाटते," असं सोनाली बेंद्रे म्हणाली होती.सोनाली बेंद्रेने नंतर तिच्या माहेरी व सासरी जेवणाच्या वेगवेगळ्या सवयींबद्दल गप्पा मारल्या. मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबात वाढलेल्या सोनालीचे पंजाबी कुटुंबात लग्न झाल्यावर तिला रोजचं



# घटस्फोटित अभिनेत्रीने दिली प्रेमाची कबुली

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी अभिनेत्री कीर्ती कुल्हारीने प्रेमाची कबुली दिली आहे. कीर्ती कुल्हारीने 'फोर मोअर शॉट्स प्लीज' सीरिजमधील तिचा सह-कलाकार राजीव सिद्धार्थबरोबर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. तिने इन्स्टाग्रामवर आपलं नातं अधिकृत केलं आहे. कीर्ती कुल्हारीने शेअर केलेला व्हिडीओ चर्चेत आहे. ४० वर्षांची कीर्ती कुल्हारी घटस्फोटानंतर ४ वर्षांनी पुन्हा प्रेमात पडली आहे. कीर्तीने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या दोघांचे अनेक रोमँटिक फोटो आहेत. गेल्या वर्षी कीर्ती कुल्हारीने 'फोर मोअर शॉट्स प्लीज!' या मालिकेतील सहकलाकार राजीव सिद्धार्थबरोबरचे अनेक फोटो पोस्ट केले होते. त्यामुळे कीर्ती व राजीव डेट करत असल्याच्या चर्चा होत होत्या. पण तेव्हा या दोघांनी याबद्दल बोलणं टाळलं होतं. पण शुक्रवारी, २ जानेवारीला कीर्तीने इन्स्टाग्रामवर आपल्या चाहत्यांशी ही आनंदाची बातमी स्वतः शेअर केली.कॉफी डेट्सपासून ते कारमधील सेल्फी आणि एकत्र फिरायला गेल्यावरचे काही फोटो या व्हिडीओत पाहायला मिळतात. या रीलमध्ये कीर्ती आणि राजीव सिद्धार्थचे अनेक रोमँटिक क्षण आहेत.कीर्ती कुल्हारीने हा व्हिडीओ शेअर केल्यावर मानवी गागरू, अनुराधा तिवारी, कनुप्रिया गोएंकासह अनेक कलाकारांनी तिला व राजीवला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच चाहत्यांनी कीर्तीच्या या व्हिडीओवर लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे.कीर्ती कुल्हारीचं पहिलं लग्न अभिनेता साहिल सेहगलशी झालं होतं. पण पाच वर्षांच्या संसारानंतर २०२१ मध्ये त्यांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. कीर्तीने यासंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट केली होती."सर्वांच्या माहितीसाठी ही पोस्ट करतेय की मी आणि माझे पती साहिल यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. फक्त कागदोपत्री नाही, तर आयुष्यात. हा एक असा निर्णय आहे जो कदाचित कोणासोबत तरी असण्याच्या निर्णयापेक्षा जास्त अवघड आहे. कारण तुम्ही दोघे एकत्र येता तेव्हा तुमच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने सेलिब्रेशन केलेलं असतं. आणि नंतर विभक्त होण्याचा निर्णय घेतो तेव्हा त्या सर्व लोकांनाही दुःख होतं, आपण त्यांना त्रास देतो. त्यामुळे हा निर्णय आमच्यासाठी सोपा नव्हता. पण ज्यांना माझी खरंच काळजी वाटते, त्यांना मी सांगू इच्छिते की मी ठिक आहे. यानंतर पुन्हा कधीच मी यावर कोणतीही टिप्पणी करणार नाही," अशी पोस्ट कीर्ती कुल्हारीने घटस्फोटानंतर केली होती.

# स्टार प्रवाहची लोकप्रिय मालिका संपणार

'स्टार प्रवाह' वाहिनीवर २८ एप्रिल २०२५ रोजी 'कोण होतीस तू, काय झालीस तू!' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली. या मालिकेच्या माध्यमातून 'सुख म्हणजे नक्की काय असतं!' फेम गौरी-जयदीपच्या जोडीने वाहिनीवर कमबॅक केलं. गिरीजा प्रभू व मंदार जाधव पुन्हा एकत्र झळकणार या बातमीने सगळेच आनंदी झाले होते. या मालिकेला रात्री आठ वाजताचा प्राइम स्लॉट देण्यात आला होता. पण, आता अवघ्या ८ महिन्यांत ही सिरियल सर्वांचा निरोप घेणार आहे. 'कोण होतीस तू, काय झालीस तू!' ही मालिका सुरुवातीला रात्री आठ वाजता, त्यानंतर रात्री ११ वाजता आणि सध्या साडेदहा वाजताच्या स्लॉटला प्रसारित केली जात आहे. पण, आता मधुराणी प्रभुलकरची नवीन मालिका सुरू होत असल्याने वाहिनीवर काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. रेश्मा शिंदेच्या घरोघरी मातीच्या चुली या मालिकेची वेळ बदलून रात्री १०:३० वाजताची करण्यात आली आहे. तर, यश-कावेरीची 'कोण होतीस तू, काय झालीस तू!' मालिका सर्वांचा निरोप घेणार आहे.या मालिकेच्या शेवटच्या भागात काय घडणार? याची झलक अभिनेत्री नंदिनी वैद्य यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये पाहायला मिळत आहे. यामध्ये त्या पूर्णिमा ही भूमिका साकारत होत्या. नुकतंच या मालिकेचं शूटिंग पार पडलं. नंदिनी यांनी शेअर केलेल्य व्हिडीओमध्ये या मालिकेचा शेवट कसा होणार याची अन् स्क्रिप्टची झलक पाहायला मिळत आहे.यश-कावेरीचा लग्नसोहळा पार पडून माँ या दोघांचा स्वीकार करणार आहे. यानंतर विद्या सर्वांना आग्रह करते की चला आपण सगळे मिळून एक फोटो काढूयात. सगळेजण सेल्फी मोड ऑन करून फोटो काढतात आणि इथेच मालिकेचा शेवट होतो. समाप्त... सेटवरचा व्हिडीओ शेअर करत नंदिनी वैद्य लिहितात, "प्रत्येक गोष्टीचा शेवट ही एक नवीन सुरुवात असते. तुम्ही दिलेल्या प्रेमाबद्दल तुमचे खूप-खूप आभार. मी माझ्या मनातील कृतज्ञता शब्दांत व्यक्त करू शकत नाही. लवकरच पुन्हा भेटू! सर्वांना २०२६ या नवीन वर्षाच्या खूप-खूप शुभेच्छा."दरम्यान, ५ जानेवारीपासून स्टार प्रवाह वाहिनीवर प्रेक्षकांना सायंकाळी ७:३० वाजता 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही मालिका पाहायला मिळेल. तर, घरोघरी मातीच्या चुली ही मालिका रात्री १०:३० वाजता प्रसारित केली जाईल. 'स्टार प्रवाह' वाहिनीवर २८ एप्रिल २०२५ रोजी 'कोण होतीस तू, काय झालीस तू!' ही नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली. या मालिकेच्या माध्यमातून 'सुख म्हणजे नक्की काय असतं!' फेम गौरी-जयदीपच्या जोडीने वाहिनीवर कमबॅक केलं. गिरीजा प्रभू व मंदार जाधव पुन्हा एकत्र झळकणार या बातमीने सगळेच आनंदी झाले

## मुस्तफिजूरला विरोध
### बांगलादेशी खेळाडूची केकेआरमधून हकालपट्टी करा

# शिवसेनेचा शाहरुख खानला इशारा!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचे पडसाद भारतातही उमटत आहेत. भारतात ठिकठिकाणी बांगलादेशविरोधात आंदोलने करण्यात आली. तसेच आयपीएलमध्ये बांगलादेशी खेळाडूंना खेळण्यास घेऊ नये, अशीही मागणी जोर धरत आहे. बॉलिवूडचा अभिनेता शाहरूख खानच्या कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) या संघाने यंदा बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला ताफ्यात सामील केले होते. मुस्तफिजूर संघातून काढून टाकावे, अशी मागणी शिवसेनेने (ठाकरे) केली आहे.**

## मुस्तफिजूर संघातून काढून टाका



शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रवक्ते आनंद दुबे यांनी मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमध्ये खेळवण्यासा जोरदार विरोध दर्शवला आहे. बांगलादेशमध्ये हिंदू बांधवांचा छळ होत असून हा विषय आता राष्ट्रीय सुरक्षेशी जोडला गेलेला आहे. बांगलादेश आणि पाकिस्तान यांचा डीएनए एकच आहे. त्यामुळे भारतीय भूमीवर आणि आयपीएलमध्ये त्यांच्या खेळाडूंवर खेळण्यापासून बहिष्कार टाकला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.एएनआय वृत्तसंस्थेशी बोलत असताना आनंद दुबे म्हणाले, “आयपीएलमध्ये विदेशी खेळाडू खेळतात. पण पाकिस्तान आणि बांगलादेशच्या खेळाडूंना तिथे स्थान देऊ नका. कारण ते आपला द्वेष करतात. तिथे आपल्या हिंदू बांधवांची हत्या होत आहे. पाकिस्तान-बांगलादेशचा डीएनए एकच आहे. दोन्ही देश गुडघ्यावर येऊन भारताची माफी मागत नाहीत, तोपर्यंत त्यांच्याशी कुठलेही संबंध ठेवता कामा नये. मग ते क्रीडा, सांस्कृतिक, राजकीय किंवा व्यापाराचे क्षेत्र असेल. आपल्याला त्यांच्यापासून अंतर राखायला हवे.”शाहरुख खानने तात्काळ त्या बांगलादेशी खेळाडूला त्याच्या संघातून काढून टाकावे. त्याने असे केल्यास ते देशभक्तीचे प्रतीक ठरेल. पण इतका गदारोळ होऊनही शाहरुख खानबाबत शंका व्यक्त होऊ शकते. ते या देशात राहून पैसे तर कमवतात पण या देशाची भावना समजत नाहीत, असे दिसेल. या देशासाठी अनेकांनी प्राणाची आहुती दिली आहे. हा दिवस पाहण्यासाठी त्यांनी नक्कीच बलिदान दिलेले नव्हते”, अशी भावना आनंद दुबे यांनी व्यक्त केली.आनंद दुबे पुढे म्हणाले, “शाहरुख खान उत्तम कलाकार आहेत. आपल्या सर्वांचेच ते लाडके आहेत. पण आता पैसे, व्यापार आणि मनोरंजनाचा विषय नाही तर देशाचा प्रश्न आहे. देशापेक्षा मोठा कोणताही धर्म नाही. शिवसेना किंवा भाजपाच्या नेत्यांनी सांगण्याआधी शाहरुख खानने त्या

### आयपीएल खेळवण्यास विरोध

> रहमानला आयपीएलमध्ये खेळवण्यासा जोरदार विरोध दर्शवला आहे. बांगलादेशमध्ये हिंदू बांधवांचा छळ होत असून हा विषय आता राष्ट्रीय सुरक्षेशी जोडला गेलेला आहे. बांगलादेश आणि पाकिस्तान यांचा डीएनए एकच आहे. त्यामुळे भारतीय भूमीवर आणि आयपीएलमध्ये त्यांच्या खेळाडूंवर खेळण्यापासून बहिष्कार टाकला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.एएनआय वृत्तसंस्थेशी बोलत असताना आनंद दुबे म्हणाले, “आयपीएलमध्ये विदेशी खेळाडू खेळतात.

बांगलादेशी खेळाडूची हकालपट्टी करावी. जेणेकरून ते देशाच्या भावनेला समजतात, हा संदेश लोकांमध्ये जाईल.”बांगलादेशी खेळाडू आयपीएलसाठी मैदानात खेळण्यास उतरले तर धार्मिक योद्धे मैदानावर चाल करतील आणि सामने बंद पाडतील, असा इशारा उज्जैनमधील रिंमुक्तेश्वर महादेव मंदिराचे मुख्य पुजारी महावीर नाथ यांच्यासह काही साधूंनी मध्यंतरी दिला होता. बांगलादेशमध्ये एकाबाजूला हिंदूंचा छळ होत असताना दुसऱ्या बाजूला त्यांच्या क्रिकेटपटूंना भारतात खेळण्याची परवानगी देऊ नये, तसेच इतर धार्मिक नेत्यांनीही यासाठी पुढे यावे, असे आवाहन मुख्य पुजाऱ्यांनी केले आहे.नुकत्याच झालेल्या आयपीएलच्या मिनी ऑक्शनमध्ये बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमान यांच्यावर कोलकाता नाइट रायडर्सने ९.२० कोटी रुपयांची बोली लावून त्याला संघात घेतले. मात्र आता अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अत्याचारांच्या घटनांनंतर केकेआर संघावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन सोशल मिडियावर केले जात आहे.बांगलादेशमध्ये हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचे पडसाद भारतातही उमटत आहेत. भारतात ठिकठिकाणी बांगलादेशविरोधात आंदोलने करण्यात आली. तसेच आयपीएलमध्ये बांगलादेशी खेळाडूंना खेळण्यास घेऊ नये, बॉलिवूडचा अभिनेता शाहरूख खानच्या कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) या संघाने यंदा बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला ताफ्यात सामील केले होते.

# ॲशेसदरम्यान ख्वाजाचा क्रिकेटला अलविदा!

## ऑस्ट्रेलियाचा फलंदाज उस्मान ख्वाजाने क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज उस्मान ख्वाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची ॲशेस मालिका सुरू आहे. या मालिकेतील पाचवा सामना हा त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील शेवटचा सामना असणार आहे. गेल्या काही सामन्यांमध्ये त्याला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती.**




त्यामुळे त्याच्यावर निवृत्तीसाठी दबाव टाकला जात होता. दरम्यान निवृत्तीची घोषणा केल्यानंतर त्याने माजी खेळाडूंबाबत मोठे खुलासे केले आहेत.पाचव्या कसोटी सामन्याला येत्या ४ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.दरम्यान २ जानेवारीला त्याने पत्रकार परिषद घेतली आणि निवृत्तीची घोषणा केली.या पत्रकार परिषदेवेळी त्याची पत्नी रेचल देखील उपस्थित होती. ॲशेस मालिका सुरू होण्यापूर्वी ख्वाजाच्या पाठीला दुखापत झाली होती. याचा परिणाम त्याच्या फलंदाजीवरही दिसून आला. यादरम्यान त्याला

### माझ्यावर वैयक्तिक टीका

> ही अशी गोष्ट आहे जी माझ्या हातात नव्हती. पण माजी खेळाडूंनी आणि माध्यमांनी माझ्यावर जी टीका केली, ती मी २ दिवस सहन करू शकलो असतो. पण मी ५ दिवस सहन केलं. विशेष म्हणजे, ही टीका माझ्या कामगिरीबद्दल नव्हतीच.”माझ्यावर अनेकदा वैयक्तिक टीका करण्यात आली. ही टीका मी सामन्याआधी तयारी कशी करतोय याबाबत होती. ज्याप्रकारे ते भाष्य करत होते, ते खूप वैयक्तिक होतं.

खूप काही ऐकवलं गेल्याचा खुलासा त्याने पत्रकार परिषदेत केला आहे. यासह इतर खेळाडूंना मिळणारी वागणूक आणि त्याला मिळणारी वागणूक ही वेगळी असल्याचंही ख्वाजाने सांगितलं. पत्रकार परिषदेत बोलताना ख्वाजा म्हणाला, “मला आधीपासून खूप वेगळं असल्यासारखं वाटायचं आणि अजूनही तसंच वाटतंय. माझ्या मते, ऑस्ट्रेलियाचा हा संघ सर्वोत्तम संघ आहे. मला खूप अभिमान आहे. पण आदराच्या (सन्मानाबाबात) बाबतीत मला खूप वेगळं वाटलं आहे. मला जी वागणूक दिली गेली आणि ज्या प्रकारे गोष्टी घडल्या, ते खूप वेगळं होतं.”

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

दि. 3 जानेवारी 2026

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## अनिताताई काटे यांच्या प्रचारासाठी

# कुटुंबीयांसह कार्यकर्ते मैदानात!

### प्रभाग क्रमांक 28 पिंपळे सौदागर-रहाटणीमध्ये अनिताताई काटे यांच्या प्रचाराला वेग

। पिंपळे सौदागर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. २८ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार अनिताताई संदीप काटे यांच्या प्रचाराला वेग आला आहे.**






प्रचाराची धुरा स्वतः काटे कुटुंबीयांनी खांद्यावर घेतली असून, पती संदीपशेठ काटे, दीर निलेश काटे तसेच पुतण्या धीरज काटे यांनी घराघरात जाऊन जनसंपर्काचा धडाका लावला आहे. गुरुवारी (दि. 02) रोजी पिंपळे सौदागर परिसरातील शिवार गार्डन, कुणाल आयकॉन, विश्वशांती कॉलनी या भागांत नागरिकांशी प्रत्यक्ष भेट घेऊन संवाद साधण्यात आला.

या भेटीदरम्यान प्रभागातील प्रलंबित प्रश्न, नागरी सोयीसुविधा, रस्ते, पाणी, स्वच्छता आदी मुद्द्यांवर नागरिकांनी आपली मते मांडली. त्यावर काटे कुटुंबीयांनी योग्य तो आढावा घेऊन समस्यांवर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

'आपलं मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींना-म्हणजेच विकासाला' या संकल्पनेला मतदार साद घालताना दिसत आहेत. भाजपाची विकासाभिमुख ध्येयधोरणे, केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या विविध योजना यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. निवडणूक जवळ येत असल्याने प्रभागात राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी काही दिवसांमध्ये भाजप नेतृत्वाच्या उपस्थितीत विविध बैठका, जनसंपर्क सभा आणि मोहिमा राबवण्यात येणार असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

"प्रचारादरम्यान मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि व्यक्त झालेला विश्वास हा आगामी निवडणुकीतील विजयाचा पाया ठरेल, असा विश्वास अनिताताई संदीप काटे यांनी व्यक्त केला. महिलांसाठी, ज्येष्ठांसाठी आणि तरुणांसाठी वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प अनिताताई संदीप काटे यांनी व्यक्त केला."

---

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारकाच्या आश्वासनावर अपक्ष अर्ज मागे!

### मिशन-PCMC: धनगर समाजाच्या सन्मानासाठी अरुण पाडुळे यांचा आदर्श!

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्रमांक ११ मधून भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक उमेदवार म्हणून सौ. कविताताई अरुण सुभाष पाडुळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, पक्षाची अधिकृत उमेदवारी न मिळाल्यानंतर, समाजाच्या हितासाठी त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. याचा फायदा भारतीय जनता पार्टीला प्रभाग ११, १२ आणि १ मध्ये होणार आहे.**



> "माझ्या वैयक्तिक स्वार्थापेक्षा समाजाची अस्मिता आणि सन्मान महत्वाचा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक उभारण्याचा विश्वास मिळाला तर समाजाच्या हितासाठी मी नेहमीच कार्य करण्यास तयार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक उभारणीच्या आश्वासनावर पक्ष आणि समाजाच्या एकतेसाठी निर्णय घेतला.
>
> **–अरुण पाडुळे, राष्ट्रीय खेळाडू.**

अरुण पाडुळे यांनी स्पष्ट केले की, संपूर्ण भोसरी विधानसभा मतदारसंघातील धनगर समाजाने भारतीय जनता पक्षाकडे मोठ्या अपेक्षा ठेवल्या होत्या. त्यामुळे समाजातील नेतृत्व करण्याची क्षमता असणाऱ्या कमीत कमी तीन ते चार व्यक्तींना उमेदवारी मिळावी, ही समाजाची भावना होती. आपल्या वैयक्तिक स्वार्थापेक्षा समाजाच्या अस्मितेला प्राधान्य देत, पाडुळे यांनी प्रभागात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक व त्यांच्या नावाचे वाचनालय उभारण्याची मागणी मांडली. ही मागणी चारही भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवारांनी लेखी स्वरूपात मान्य करावी, अशी ठाम अट त्यांनी ठेवली. अन्यथा अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय पाडुळे यांनी स्पष्ट केला होता. कार्तिक लांडगे यांनी या वेळी भावनिक शब्दांत सांगितले, "अरुण, तू काहीही वैयक्तिक मागणी केलेली नाहीस. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे स्मारक व्हावे, यासाठी आम्ही पूर्ण प्रयत्न करणार आहोत."

यानंतर अधिकृत उमेदवार निलेश नेवाळे, कुंदन गायकवाड, सचिन सानप आणि योगिता नागरगोजे यांनी ही मागणी लेखी स्वरूपात मान्य केली. ही मान्यता पिंपरी-चिंचवड धनगर समाज महासंघाचे अध्यक्ष महावीर काळे, समाजाचे जेष्ठ महादेवजी कवितके, पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गजानन वाघमोडे, पोपटजी हजारे, जय हरी ग्रुपचे अध्यक्ष मारुती महाराज शेजाळ, महादेव महाराज शिंदे आदी समाजमान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

समाजाच्या सन्मानासाठी व पक्षाच्या एकतेसाठी दिलेल्या आश्वासनाच्या आधारे अरुण पाडुळे यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला. हा निर्णय स्वतःच्या राजकीय संधीपेक्षा समाजाच्या अस्मितेला प्राधान्य देण्याचा प्रतीक असून, अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल.

## राजेश वाबळे यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराला वेग

# शिवसेना पॅनलला प्रभाग 20 मध्ये अनुकूल वातावरण!

## विकासाच्या मुद्द्यांवर मतदारांचा सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक २० (संत तुकाराम नगर, वल्लभनगर, महात्मा फुलेनगर, लांडेवाडी, कासारवाडी, नाणेकर चौक) मधील राजकीय वातावरण तापले असून शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. शिवसेना महानगरप्रमुख राजेश चिमणराव वाबळे यांच्या नेतृत्वाखाली 'धनुष्यबाण' चिन्हावर निवडणूक लढवणाऱ्या पॅनलला मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.**




प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन प्रचारात उतरलेल्या या पॅनलकडून नागरी सुविधा, पायाभूत विकासकामे, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा तसेच महिला व युवकांसाठीच्या योजनांवर भर दिला जात आहे. 'तुमचा विश्वास... आमचा ध्यास... प्रभागाचा सर्वांगीण विकास' हे ब्रीदवाक्य घेऊन मतदारांशी संवाद साधण्यात येत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जनहितार्थ योजनांचा लाभ प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला आहे. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २० ला 'आदर्श प्रभाग' म्हणून विकसित करण्याचा संकल्पही प्रचारादरम्यान मांडण्यात येत आहे.

या प्रभागातून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून विनोद नामदेव वाघमारे, वैशाली राजेश वाबळे, स्वीटी निलेश मलातपुरे आणि राजेश चिमणराव वाबळे निवडणूक रिंगणात असून, अनुभवी नेतृत्व, दांडगा जनसंपर्क आणि आतापर्यंत केलेल्या विकासकामांचा अनुभव ही या पॅनलची जमेची बाजू मानली जात आहे. विशेषतः 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महिला मतदारांमध्ये शिवसेनेकडे सकारात्मक कल दिसून येत आहे.

दरम्यान, प्रभागातील नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी आणि परिसराच्या शाश्वत विकासासाठी शिवसेनेच्या सर्व अधिकृत उमेदवारांना 'धनुष्यबाण' चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन राजेश वाबळे यांनी केले आहे. येत्या गुरुवारी, १५ जानेवारी रोजी सकाळी सात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत मतदान होणार असून, मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेही त्यांनी आवर्जून

# वाकड-ताथवडे-पुनावळेत परिवर्तनाची लाट

## भाजप उमेदवार श्रुती वाकडकर यांचा झंझावाती जनसंपर्क

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहू लागले असून, प्रभाग क्रमांक २५ 'क' मधील भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार श्रुती राम वाकडकर यांनी आपल्या प्रचाराचा धडाका लावला आहे. वाकड, ताथवडे आणि पुनावळे या भागातील विविध सोसायट्यांमध्ये जाऊन त्यांनी नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी त्यांनी केवळ आश्वासनं न देता, स्थानिक समस्या समजून घेऊन त्या लवकरात लवकर सोडवण्याचा शब्द दिल्याने सर्वच स्तरातून त्यांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.**



### 'लढणार आणि बदल घडवणार'चा निर्धार; सोसायट्यांमध्ये नागरिकांशी थेट संवाद आणि समस्या निवारणाचे आश्वासन

प्रचारादरम्यान श्रुती वाकडकर यांचा दांडगा जनसंपर्क दिसून येत आहे. त्यांच्या रॅली आणि बैठकींमध्ये तरुणांचा वाढता उत्साह, ज्येष्ठ नागरिकांनी दिलेले आशीर्वाद आणि महिला वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग यांमुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. "जनतेचा प्रेमळ प्रतिसाद आणि वाढता पाठिंबा पाहता, आपण १०० टक्के निवडून येऊ," असा ठाम विश्वास वाकडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

### प्रचारात या 5 गोष्टी ठरतायत जमेची बाजू

१. विकासाभिमुख दृष्टीकोन: भविष्यातील गरजांचे योग्य नियोजन.
२. संघटनात्मक अनुभव: प्रदीर्घ समाजकार्याचा दांडगा अनुभव.
३. थेट संवाद: समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याची वृत्ती.
४. स्थानिक प्रश्नांची जाण: प्रभागातील प्रत्येक गल्ली आणि समस्येची सखोल माहिती.
५. महिला नेतृत्व: महिलांच्या प्रश्नांना खंबीरपणे वाचा फोडणारे नेतृत्व.

> "प्रभागातील महिलांशी संवाद साधताना त्यांचे आरोग्य आणि घरगुती प्रश्न गंभीर असल्याचे जाणवले. या समस्यांवर केवळ आश्वासने न देता ठोस उपाययोजना करण्याचे मी त्यांना वचन दिले आहे. जनतेचा हा उत्स्फूर्त प्रतिसादच माझ्या विजयाची पोचपावती आहे."
> **—श्रुती राम वाकडकर,** (उमेदवार, प्रभाग २५ क, भाजपा)

**विकासाचा 'रोडमॅप' आणि प्रमुख आश्वासने**

श्रुती वाकडकर यांनी प्रभागातील प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले असून, त्यांनी नागरिकांना खालील प्रमुख कामांचे आश्वासन दिले आहे:
पाणी आणि रस्ते:- प्रभागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था प्राधान्याने दूर करणार.
महिला सुरक्षा व आरोग्य: -महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि आरोग्यासाठी ठोस उपाययोजना राबवणार.
सर्वांगीण विकास: -आधुनिक सोयीसुविधांनी युक्त असा आदर्श प्रभाग घडवण्याचा ध्यास.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046